# महसुल सेवक (कोतवाल)संवर्ग सरळसेवा भरती २०२६
# तालुका मुरुड, जिल्हा रायगड
# <u>जाहीरनामा</u>

मुंबई कनिष्ठ गाव कामगार वतन निर्मुलन अधिनियम १९५८ (Bombay Interior Watan Abolition Act 1958) अन्वये गाव वतने नष्ट करण्यात आल्यानंतर वतनदारी पध्दत संपुष्टात आली असून, राज्यात दि.०१/१२/१९५९ पासून पगारी कोतवालांची पध्दत अंमलात आली आहे. त्यानुसार शासन परिपत्रक दि.०७ मे १९५९ अन्वये **कोतवाल भरती व नेमणूक सेवाप्रवेश नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमामध्ये शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक-केओटी/प्र.क्र.४३२/ई-१० दि.०५/०९/२०१३ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. तसेच शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ई-१० दि.१७/०५/२०२३ अन्वये कोतवाल पदभरती संदर्भात सुधारित मार्गदर्शन निर्गमित केलेले आहे.**

**शासन, महसुल व वन विभागाकडील पत्र क्र.पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०, दि.१९/०८/२०२६ महसूल सेवकांची रिक्त पदे भरण्यासाठी "एक विशेष बाब" म्हणून भरण्यास मान्यता दिलेली आहे. शासन, महसुल व वन विभागाकडील पत्र क्र.पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०, दि.०३/०९/२०२६ अन्वये कोतवाल पदभरती** २०२६ **कार्यक्रम घोषित केलेला आहे**. त्यानुसार **मुरुड तालुक्यातील** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय महसुल सेवकांची नेमणुक केली जाणार आहे.

तरी ज्या पात्र व्यक्तीस महसुल सेवक (कोतवाल) म्हणून काम करणेची इच्छा आहे, त्यांनी **दि.०२/१०/२०२६ ते दि.१७/१०/२०२६** या कालावधीत **कार्यालयीन वेळेत (सार्वजानिक सुट्टीचे दिवस वगळून) समक्ष पोहोच होईल** आशा रितीने विहीत नमुन्यामध्ये **तहसील कार्यालय मुरुड** येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दाखल करावा.

**महसुल सेवक (कोतवाल)पदनियुक्तीसाठी प्रवर्ग निहाय आरक्षणाचा तपशील**

| जात प्रवर्ग/ सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | भरावयाची पदे |
|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | महिला | |
| अनु. जाती | १ | १ | २ |
| भटक्या जामती (ब) | १ | ० | १ |
| एस.ई.बी.सी. | १ | ० | १ |
| इ.मा.व. | १ | १ | २ |
| ई.डब्लू.एस. | १ | ० | १ |
| खुला/ अराखीव | ३ | १ | ४ |
| एकूण | ८ | ३ | ११ |

(टिप - पदाच्या एकुण संख्येमध्ये व आरक्षणामध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.)

अ) **<u>पात्रतेच्या अटी :-</u> महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ठराव क्र. पीकेए/१०५१/ल-६, दिनांक ०७/०५/१९५९ प्रमाणे महसूल सेवक कोतवालांच्या नेमणूका व नोकरी याबाबत अटी व शर्ती उमेदवारांवर बंधनकारक राहतील. तसेच महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी इच्छूक उमेदवार पुढील नमूद केलेल्या अटीस पात्र असणे आवश्यक आहे.**

**१. शैक्षणिक अर्हता** :- उमेदवार किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असावा व त्यास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

**२. वयोमर्यादा**:-

२.१ सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी जाहिरनामा प्रसिध्द होणाऱ्या दिनांकास म्हणजे दि.०२/१०/२०२६ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ४० वर्षे वय असावे.

२.२ महसुल सेवक (कोतवाल) हे पद वर्ग-अ ते वर्ग-ड अशा कोणत्याही संवर्गात मोडत नाही. सदर पद हेअवर्गीकृत असल्यामुळे सामाजिक, आर्थिक आरक्षण आणि महिला आरक्षण वगळता अन्य कोणत्याही आरक्षणाच्या तरतुदी व अन्य सवलती जसे की, वयोमर्यादेतील शिथिलता इत्यादी बाबी महसुल सेवक (कोतवाल)भरतीसाठी लागू असणार नाही.

**३. रहिवास**:-उमेदवार हा मुरुड तालुक्यातील रहीवासी असावा.

**४. आरक्षण**:-

४.१ सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागांच्या बाबतीत अर्जदाराला सक्षम प्राधिका-याने दिलेला जातीचा / प्रवर्गाचा दाखला आणि नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असेल तेथे) यांच्या साक्षांकित प्रती अर्जा सोबत सादरकरणे बंधनकारक राहील.

४.२ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

४.३ महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे सन २०२६-२७ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागासप्रवर्गांना लागू राहील.

४.४ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदरावांराकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध असणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांमध्ये (EWS) मोडत असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

४.५ सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील ( SEBC ) उमेदवारांकरिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-2024/प्र.क्र.75/कारकून-5, दि.29 जानेवारी 2025 (किंवा तत्सम लागू असणाऱ्या अधिनियमानुसार व समयचित शासन निर्णयानुसार विहीत करण्यात आलेले, चालु तारखेस वैध असणारे जात प्रमाणपत्र (Cast Certificate), आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र

(Non-Creamy Layer Certificate) यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील .जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहुन दिल्यानंतर तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर कमाल ६ महिन्यांच्या विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

४.६ महसूल सेवक (कोतवाल) हे पद एका सजेत एकच असते. त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडु यासारखी समांतर आरक्षणे लागू नाही.

## ५. वर्तणूक :-

५.१ अर्जदारांवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसावा. अथवा कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात शिक्षा/दंड झालेला नसावा.अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी निवडीनंतर १ महिन्याच्या आत सक्षम अधिकारी यांचा चारित्र्य व वर्तणूक प्रमाणपत्र सादर करणेआवश्यकआहे.

५.२ महसुल सेवकास त्याची नेमणूक झाल्यानंतर भारतीय संविधानाशी निष्ठा व्यक्त करणारी विहीत केलेली शपथ घ्यावी लागेल व त्याप्रमाणे आचरण ठेवावे लागेल.

५.३ भरती प्रक्रिये दरम्यान कोणताही राजकीय/अन्य प्रकारचा दबाव आणल्यास अर्जदारास तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

५.४ अर्जदार हा कोणत्याही राजकीय पक्षाचा अथवा राजकीय संघटनेचा सभासद नसावा.

५.५ अर्जदार हा महसुल सेवक (कोतवाल)पदाची कर्तव्ये पारपाडणेस बाधक अथवा हानिकारक होईल अशा कोणत्याही व्यवसायात/कामात गुंतला नसावा.

## ६. शारिरीक पात्रता:-

६.१ अर्जदाराचे शारिरिक व मानसिक आरोग्य उत्तम असावे.

६.२ अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी निवडीनंतर १ महिन्यांच्या आत शारीरिक तंदुरुस्ती बाबतचे मा.जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड-मुरुड यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

६.३ महसूल सेवक (कोतवाल) यांना क्षेत्रिय स्तरावर (Field Work) काम करावे लागते त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगांसाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

## ७. मानधन व सवलती :-

७.१ शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या दराने व नियमानुसार देय असलेले मानधन तसेच वेळोवेळी देय केलेल्या सवलती महसुल सेवक (कोतवाल) पदास अनुज्ञेय असतील.

## ८. सेवा शर्ती नियम:-

८.१ महसुल सेवक (कोतवाल) नियुक्ती अस्थायी तत्वावर असेल.

८.२ महसुल सेवक (कोतवाल) हे पद अवर्गीकृत असून शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सेवा व शर्ती लागू राहतील तसेचत्यांना नियमित वेतन अथवा कोणतेही सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाही.

## ब) अर्ज भरण्याची पध्दत :-

१. प्रस्तुत पदासाठी विहीत नमुन्यातील अर्ज **तहसीलदार मुरुड** यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावा. अर्जासाठी रोख स्वरुपात शुल्क रु.५०/- आकारण्यात येतील. शुल्क पावती अर्ज घेतेवेळी प्राप्त करुन घ्यावी.

२. तहसीलदार कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यात आलेला अर्जच ग्राहय धरण्यात येईल. याव्यतिरिक्त अन्य मार्गाने (उदा.झेरॉक्स प्रतीवर अर्ज करणे, अन्य ठिकाणाहून छपाई करुन घेणे) दाखल केल्यास असा अर्ज छाननी वेळी बाद केला जाईल.

३. अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच **दिनांक १७/१०/२०२६ पर्यंत** कार्यालयीन वेळेत (सार्वजानिक सुट्टी वगळून) प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक राहील.अन्य मार्गाने उदा .**पोष्टाव्दारे व ईमेलद्वारे** आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे विहीत मुदतीनंतर अर्ज स्विकारला जाणार नाही.

४. उमेदवाराने त्यांचे अलीकडील काळातील रंगीत छायाचित्र अर्जावर विहीत ठिकाणी स्वसाक्षांकित करुन घट्ट चिकटवावे. याशिवाय अतिरिक्त दोन रंगीत छायाचित्रे अर्जासोबत द्यावीत.

५. शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसूचना क्रमांकएसआरव्ही-२०००/प्र.क्र.१२७/(२०००)/१२ दि.२८/०३/२००५ व शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही /२०००/ प्र.क्र. १७/ २०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ नुसार अर्जासोबत लहान कुटूंबाचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापनाचा विहीत नमुना अर्जासोबत उपलब्ध करुन दिला आहे.उमेदवार अविवाहीत असल्यास लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापनावर अविवाहीत असे स्पष्ट नमुद करावे.लहानकूटूंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास, असा अर्ज फेटाळणेस पात्र राहील.

६. उमेदवार अनुसुचित जाती/जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवारा व्यतिरिक्त असल्यास अशा उमेदवारांना प्रगत उन्नत गटात मोडत नसलेबाबत सक्षम अधिका-याचे (नॉन क्रिमीलेअर) ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्र छाननीचे वेळी जोडणे आवश्यक राहील. असे प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

७. मागासवर्गीय उमेदवाराने ज्या प्रवर्गातून अर्ज केला असेल त्या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक राहिल. (जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याची साक्षांकित प्रत सादर करावी.)

८. अर्जदार ज्या आरक्षित प्रवर्गातून अर्ज करणार आहे, तो प्रवर्ग अर्जामध्ये अचूक रितीने नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर अर्ज फेटाळणेस पात्र राहील.

९. अर्जदारयांनी ज्या प्रवर्गातून अर्ज केला आहे, त्याच प्रवर्गातून त्याच्या अर्जाचा विचार केला जाईल.

१०. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उन्नत /प्रगत (क्रिमीलेअर) व्यक्तींना इतर मागासवर्गीय प्रवगांचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

११. अर्जदाराने किमान शैक्षणिक अर्हता धारण करित असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे. चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवाराच्या नावात कोणताही बदल झाला असल्यास, त्या पृष्ठर्थ संबंधीत शासन राजपत्राची साक्षांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. यापरोक्त किमान अर्हतेपेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता धारण करित असल्यास, त्यासंदर्भातील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१२. महिला उमेदवाराने पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१३. अर्जासोबत समक्ष प्राधिकाऱ्याने दिलेल्या महाराष्ट्र राज्याचे वय, अधिवास प्रमाणपत्राची छायापत्र जोडणे बंधनकारक रहील.

१४. विहीत नमुन्यातील नसलेला अर्ज, विहीत शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराचे अर्ज, विहीत शैक्षणिक/रहिवास/जात प्रवर्ग इत्यादी अर्हता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करुन न जोडलेले अर्ज, फोटो नसलेला व स्वसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे व विहीत मार्गाने प्राप्त न होणारेअर्ज विचारात घेतले जाणार नाहीत वत्याबाबत कोणताही  पत्रव्यवहार केला जाणार नाही.अर्ज भरताना दिलेली माहिती खोटी किंवा विसंगत किंवा दिशाभूल करणारी असल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास सदर अर्ज बाद ठरविण्यात येतील.

१५. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची/संघटनेची/व्यक्तिची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा सदरील अर्ज तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

१६. कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध न ठेवणेबाबतचे रुपये १०० च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

१७. अर्जामध्ये खोटी, चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहीती देणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल.

१८. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

## क) <u>अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :-</u>

१. इयत्ता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुणपत्रिका/सनद.

२. शाळा सोडलेचा दाखला किंवा जन्मतारखेचा उल्लेख असलेले बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र किंवा सनद किंवा जन्म दाखला.

३. मुरुड तालुक्यातील गावचा रहिवाशी असलेबाबत मुख्यधिकारी नगरपरिषद अथवा ग्रामसेवक यांनी दिलेला रहिवाशी दाखला.

४. महाराष्ट्र राज्याचे वय, अधिवास प्रमाणपत्राची (डोमासाईल) प्रत.

५. अर्जासोबत आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची स्वसांक्षाकित प्रत जोडावी.

६. आरक्षित पदाचे अर्जाकरीता जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास), इतर मागासवर्गाकरीता उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचालूतारखेस वैध असणारे प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate),आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी चालू तारखेचे EWS प्रमाणपत्र (जे लागू असेल ते) जोडणे अनिवार्य आहे.

७. सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित अथवा स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

## ड) <u>परीक्षाशुल्क:-</u>

१. खुल्या प्रवर्गतील उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क र.रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क र.रु.३००/- (अक्षरी रुपये तीनशेमात्र) राहील. सदरचे शुल्क रोख स्वरुपात तहसीलदार **मुरुड** यांचे कार्यालयात अर्ज दाखल करतेवेळी जमा करणे आवश्यक आहे. परिक्षा शुल्क पावती अर्ज दाखल करतेवेळी प्राप्त करुन घ्यावी.

२. अराखीव (खुल्या) प्रवर्गातून अर्ज केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांस परीक्षा शुल्कात सवलत आवश्यक असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

३. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) व अपरिवर्तनीय (Non-Transferable) राहील.

## इ) <u>परीक्षापध्दती व निकाल:-</u>

### १. परीक्षा पध्दती:-

१.१ महसुल सेवक (कोतवाल) पदाचे निवडीकरीता महसुल व वनविभाग शासन निर्णय दि.१७/०५/२०१३ अन्वये विहीत केलेप्रमाणे १०० गुणांची लेखी परीक्षा असेल. लेखी परीक्षा दि.११/११/२०२६ रोजी प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या परीक्षा केंद्रावर व नमुद केलेल्या वेळी घेण्यात येईल.

१.२ लेखी प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. सदर प्रश्नपत्रिकेत एकूण ५० प्रश्न असून प्रत्येक बरोबर उत्तरासाठी २ गुण मिळतील. चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा होणार नाहीत.

१.३ लेखा परीक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा, रायगड जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती इ. यांचा समावेश राहील.

१.४ गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर म्हणजेच एकुण १०० गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहील.

१.५ परीक्षेच्या दरम्यान कोणतेही अनुचित/बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या अथवा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांना भरती प्रक्रियेतून तात्काळ अपात्र ठरविले जाईल.

१.६ उमेदवारांना लेखी परीक्षेला व कागदपत्रे पडताळणीकामी उपस्थित राहण्यासाठी कोणताही प्रवास खर्च इतर खर्च दिला जाणार नाही.

### २. निकाल पध्दती:-

२.१ लेखी परीक्षा पार पडलेनंतर उत्तर पत्रीका/तालिका **तहसिल कार्यालय मुरुड व उपविभागीय अधिकारी कार्यालय अलिबाग** येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

२.२ उत्तर पत्रीका/तालिकेच्या अनुषंगाने आक्षेप प्राप्त झाल्यास त्यावर उपविभागस्तरीय समितीद्वारे घेतलेला निर्णय अंतिम राहील व त्यानुसार अंतिम उत्तर पत्रीका/तालिका प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात येईल.

२.३ तद्नंतर लेखी परीक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांक निहाय **तहसिल कार्यालय मुरुड व उपविभागीय अधिकारी कार्यालय अलिबाग** येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

२.४ लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारेप्रवर्ग निहाय उमेदवारांची निवडयादी व प्रतिक्षा यादी तयार केली जाईल.

२.५ **उमेदवारांना लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे मुळ कागदपत्रे तपासणीकामी तात्पुरती निवड यादी व कागदपत्रे तपासणी अंती अंतिम निवड यादी तहसिल कार्यालय मुरुड व उपविभागीय अधिकारी कार्यालय अलिबाग** येथील नोटीस बोर्डावर **प्रसिध्द करण्यात येईल.**

२.६ किमान पात्रता गुणांबाबत तसेच पात्रतेसाठी एकाहून अधिक उमेदवारांना समसमान गुण मिळाल्या प्रकरणी प्रचलीत शासन निर्णय/नियम यामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२.७ निवड करण्यात आलेले उमेदवार नियुक्ती आदेश पारित केलेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षा यादीमधील पुढील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

२.८ उमेदवाराचे मुळ दस्ताऐवज पडताळणी केल्यानंतरच अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल.

## ६. इतर अटी व शर्ती:-

६.१ नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे, रद्द करणचे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे,सेवा भरती प्रक्रीयेत बदल करणे तसेच, भरती प्रक्रीयेसंदर्भात उद्भवणारे वाद, अन्य कोणतीही तांत्रिक/प्रशासकीय अडचणी/तक्रारी याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकारअध्यक्ष, महसुल सेवक (कोतवाल) निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग अलिबाग यांजकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

६.२ शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रीयेला लागू राहतील.

६.३ वरील ६.१ व ६.२ याबाबतीत अध्यक्ष, महसुल सेवक (कोतवाल) निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग अलिबाग यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. पदांच्या संख्येबाबत उमेदवारांची कोणतीही हरकत अथवा तक्रार यांचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी अर्ज भरताना नोंद घ्यावी.

६.४ उमेदवारांस महसुल सेवक (कोतवाल) म्हणून नेमणूक दिल्यानंतर नेमणूकीच्या सजेमध्ये वास्तव्य करणे बंधनकारक राहणार आहे अन्यथा सदर महसुल सेवक (कोतवाल) पदांवर त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल. नियुक्ती नंतर उमेदवाराने नियुक्तीच्या महसुल सेवक (कोतवाल) सजेमध्ये वास्तव्यास राहणार असलेबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.५ उमेदवाराने महसुल सेवक (कोतवाल) नियुक्ती पदावर हजर होताना मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम ५१ च्या तरतूदीनुसार वैयक्तीक प्रतिपुर्ती बंधपत्र सादर करावे लागेल.

६.६ महसुल सेवक (कोतवाल) हा पुर्णवेळ काम करणारा सेवक असेल.

६.७ भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सुधारित शासन निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

**७. महसुल सेवक (कोतवाल) भरतीचा कालबध्द कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे :-**

| अ.क्र. | तपशिल | निश्चित केलेला दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीरनामा प्रसिध्द करणे | दि.०२/१०/२०२६ |
| २ | अर्ज दाखल करणे व अर्ज प्राप्तीचा शेवट दिनांक | दि.०२/१०/२०२६ ते दि.१७/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) |
| ३ | अर्ज छानननी करणे | दि.१८/१०/२०२६ ते ०१/११/२०२६ |
| ४ | प्रवेशपत्र उपलब्ध करणे | दि.०४/११/२०२६ ते १०/११/२०२६ (उमेदवारांनी समक्ष आपले ओळखपत्र दाखवून तहसील कार्यालय मुरुड येथून कार्यालयीन दिवशी व वेळी प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.) |
| ५ | लेखी परिक्षा | दि.१५/११/२०२६ |
| ६ | उत्तरसुची आणि निकाल घोषणा | १६/११/२०२६ |
| ७ | दस्तऐवज पडताळणी | १७/११/२०२६ ते २७/११/२०२६ |
| ८ | नियुक्तीपत्र | २८/११/२०२६ |

तथापी अपरिहार्य कारणास्तव वरील कार्यक्रमात बदल करणेचा संपूर्ण अधिकार निवड समितीकडे असून अशा प्रकरणी सुधारित कार्यक्रम तपशील तहसिल कार्यालय **मुरुड** व उपविभागीय अधिकारी कार्यालय **अलिबाग** येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल.

**ठिकाण:-मुरुड**
**दिनांक:- ०२/१०/२०२६**

**सदस्य सचिव,**
**महसुल सेवक (कोतवाल)**
**निवड समिती, तथा तहसीलदार मुरुड**